# लघु पाटबंधारे विभाग जिल्हा परिषद, उस्मानाबाद.

## प्रस्तावना

आपल्या देशामध्ये 70 टक्के शेती ही पावसावर अवलंबून आहे.परंतु सध्या पावसाचे प्रमाण कमी झाल्याने तसेच जलसंधारणाच्या मोठया प्रकल्पांचा शेतकऱ्यांना फार उशिरा लाभ होत असल्याने सध्या लघु पाटबंधारे कामांना फार महत्व प्राप्त झाले आहे.लघु पाटबंधारे स्वरुपाची 0 ते 100 हेक्टर्स मधील कामे अल्प कालावधीत पूर्ण होत असलेने त्याचा लाभ त्वरीत शेतकऱ्यांना होत असतो.यामध्ये समान्यपणे पाझर तलाव,गाव तलाव,को.प.बंधारे,साठवण तलाव अशी कामे केली जातात.

अशा 0 ते 100 हेक्टर सिंचन क्षमतेमधील लघु पाटबंधारेची कामे जिल्हा परिषद मार्फत विविध लेखाशिषांतर्गत राबविली जातात.यासाठी उस्मानाबाद जिल्हा परिषद कडील लघु पाटबंधारे विभाग असून त्याअंतर्गत 8 तालुक्यातील लघु पाटबंधाऱ्याची कामे लघु पाटबंधारे उपविभाग उस्मानाबाद,तुळजापूर,उमरगा,कळंब व परंडा उपविभागामार्फत केली जातात.

## पाझर तलाव/गांव तलाव

पाणी पाझरण्यासाठी उपयुक्त असलेल्या भूस्तरीय स्तरावर नाला पाहून मातीचा बंधारा बांधून त्यामध्ये पावसाळयात पाणी साठवण्यात येते.अशा प्रकारे साठवलेले पाणी पाझरुन तलावाच्या खालील भागातील विहिरीच्या पाण्याची पातळी वाढते.तसेच पाझर तलावाखालील भूजलाची पातळी वाढविण्यास या तलावाचा उपयोग होतो. या तलावापासून होणारे सिंचन हे अप्रत्यक्ष स्वरुपाचे सिंचन असते.तलावातील उपलब्ध पाण्याचा उपयोग मत्स्यव्यवसायासाठी ही करता येतो.

## कोल्हापूर पध्दतीचे बंधारे

नदी किंवा नाले यातून पावसाळयात वाहून जाणारे पाणी दगडी बांध व झडपाद्वारे (लोखंडी गेट) आडविले जाते.यास कोल्हापूर पध्दतीचे बंधारे असे म्हणतात. यात उपसा पध्दतीने शेतकरी पाणी देवू शकतो.ज्याठिकाणी को.प.बंधाऱ्याचे वरील बाजूस मोठे धरण/तलाव असतो त्यामधून वरचेवर पाणी सोडून को.प.बंधाऱ्यामध्ये पाणी आडवून सिंचन केले जाते.

### सिमेंट नाला बांध

नदी किंवा नाले यातून पावसाळयात वाहून जाणारे पाणी दगडी बांधकाम अथवा संधनकात बांधकाम करुन पाणी आडविले जाते.यास सिमेंट नाला बांध असे म्हणतात.यामधून उपसा पध्दतीने शेतकरी शेतील पाणी देवू शकतो. ज्याठिकाणी सिमेंट नाला बांधच्या वरील बाजूस मोठे धरण/तलाव असतो त्यामधून वरचेवर पाणी सोडून सिमेंट नाला बांध मध्ये पाणी आडवून सिंचन केले जाते.

# विभागाकडील विविध लेखाशिर्षखालील माहिती (मार्च 2020 अखेर)

## जिल्हा वार्षिक योजना

सन 2019-20 या आर्थिक वर्षामध्ये मागील अपुर्ण कामासह 123 ल.पा.सामान्य कामे व 153 को.प.बंधारे या लेखाशिर्षाअंतर्गत या विभागाकडील एकूण 276 कामे हाती घेण्यात आली होती.त्यापैकी 181 पूर्ण झालेली असून 01 कामे रद्द करण्यात आली आहेत. आणि उर्वरीत 94 कामे प्रगती पथावर आहेत. तसेच या दोन्ही लेखाशिर्षाखाली रक्कम रुपये 1808.08 लक्ष एवढे अनुदान खर्च करण्यात आलेले आहे.

## जिल्हा परिषद स्वसंपादीत निधी

या लेखाशिर्षा अंतर्गत विभागाअधिनिस्त असलेल्या आणि पूर्ण झालेल्या योजनांच्या देखरेख व दुरुस्तीसाठी एकूण 23 कामे हाती घेण्यात आली आणि 12 कामे पूर्ण झालेली असून 11 कामे प्रगतीत आहेत त्यावर रुपये 49.90 लक्ष खर्च झालेला आहे.

## जलयुक्त शिवार अभियान

सन 2018-19 मधील जलयुक्त शिवार अभियान या योजने अंतर्गत मागील अपुर्ण 49 कामे हाती घेण्यात आली त्यापैकी सन 2019-20 मध्ये 48 कामे पूर्ण झालेले असुन एक(01) काम वगळण्यात आलेले आहे. या कामावर एकूण रुपये 262.06 लक्ष इतका खर्च झालेला आहे.






ल.पा.विभाग जि.प.उस्मानाबाद. ढोंकी (ता.जि.उस्मानाबाद.)सि.ना.बां.कामाचे जलपुजन व जलआवाहन.दि.17/9/2015 .